## इस्लामिक बँक स्थापण्यासाठी पंतप्रधानांकडून समितीचे गठन

वृत्तसंस्था
नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी
मुस्लिमांना कर्ज आणि अन्य आर्थिक सवलती प्रदान करण्यासाठी इस्लामिक बँकेची शक्यता पडताळून पाहण्यासाठी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी मंत्रिमंडळ सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन केले आहे.

या समितीत अर्थ, कायदा, महसूल खात्याचे सचिव आणि रिझर्व्ह बँकेच्या माजी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. अशी समिती स्थापण्यास रिझर्व्ह बँकेने यापूर्वीच विरोध दर्शविला आहे, हे येथे उल्लेखनीय. तरीही पंतप्रधानांनी पुन्हा या समितीचे गठन केले आहे. धर्माची आणि आर्थिक विषयांची सांगड घालणे उचित होणार नाही, असे स्पष्ट मत रिझर्व्ह बँकेने व्यक्त केले होते. पण, आगामी चार राज्यांच्या निवडणुका डोळ्यापुढे ठेऊन मुस्लिमांची मते ओढण्यासाठी पंतप्रधानांनी ही खेळी खेळण्याचा एकतर्फी निर्णय घेतला आहे.

२००४ साली अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी रिझर्व्ह बँकेचे अधिकारी आनंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने २००५ साली आपला अहवाल सादर केल्यानंतर रिझर्व्ह बँकेने हा प्रस्ताव फेटाळून लावला होता. काही दिवसांपूर्वी मुस्लिम खासदारांनी पंतप्रधानांना एका निवेदन सादर करून मुस्लिम बँक स्थापण्याची मागणी केली. २२ जानेवारी २००७ रोजी पंतप्रधानांनी पुन्हा ही समिती स्थापून अशी बँक स्थापणे योग्य राहील काय, तसेच या समितीचे कायदेशीर स्थान काय राहील हे जाणून घेण्याचे काम या समितीवर सोपविण्यात आले आहे.

या बँकेकडेच हज सबसिडी देण्याचे काम सोपवावे, असाही एक प्रस्ताव आहे. समिती स्थापण्याचा निर्णय अतिशय वादग्रस्त असल्यामुळे या समितीबाबत राजकीय क्षेत्रातून तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पक्षाने या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शविला आहे.

इस्लामिक बँकेमुळे मुस्लिमांना कोणतीही मदत होणार नाही. आम्ही अशा कोणत्याही प्रस्तावाला विरोध करू, असे भाजपानेते मुख्तार अब्बास नकवी यांनी म्हटले आहे. तर, कुणाचा इस्लाम या शब्दाला विरोध असेल तर तो शब्द काढून टाकावा. पण अशी बँक स्थापण्याची कारवाई पुढे चालूच ठेवावी, असे मत काँग्रेस नेते रशीद अल्वी यांनी व्यक्त केले आहे.